# उल्हासनगर महानगरपालिका

पर्यावरण विभाग
दिनांक:- ०२/०३/२०२३

## प्रेस नोट

दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी देशभरात सर्वत्र मोठया उत्साहात साजरा होणा-या होळी व त्यानंतर दुस-या दिवशी साजरा होणा-या धुलीवंदन (रंगपंचमी) या सणाचे माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत पर्यावरणपुरक साजरीकरण होणेसाठी उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये जनजागृती करण्याच्याअनुषंगाने आज दिनांक ०२/०३/२०२३ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत महापालिका मुख्यालयाच्या परिसरात प्रतिकात्मक होळी उभी करण्यात येवुन जलप्रतिज्ञा घेण्यात आली होती. त्यासोबत पर्यावरणपुरक रंगदेखील ठेवण्यात आले होते.

मा. आयुक्त अजीज शेख, मा. अति. आयुक्त, डॉ. करूणा जुईकर, मा. उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिकात्मक व पर्यावरणपुरक होळी साजरी करण्याबाबत नागरीकांमध्ये संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यादरम्यान मा. आयुक्त यांच्याहस्ते होळीच्या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

पर्यावरणपुरक होळी उभारण्यासाठी शेणाच्या गोव-या, नारळाच्या करवंटया, झावळया, कापूर इत्यादी साहित्यांचा वापर करण्यात आला असुन होळीमध्ये ज्याप्रमाणे नकारात्मक बाबींचे दहन करण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे होळी हा सण साजरा करताना नागरीकांकडून पर्यावरणाची होणारी हानी टाळण्यासाठी परिणामकारक ठरणा-या १. वृक्षतोड करणे २.पाण्याचा अपव्यय करणे ३. प्लास्टीक पिशव्यांचा वापर करणे ४. ध्वनी प्रदुषण करणे ५. रासायनिक रंगाचा वापर करणे इत्यादी घातक बाबींचे दहन करणेबाबत संदेश देण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत, लिपीक, श्री. सयाजी घाटविसावे यांनी केले. यावेळी महापालिकेतील इतर सर्व अधिकारी व कर्मचारी, महापालिका शाळा क्र.१७ चे विद्यार्थी व शिक्षक तसेच सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

( डॉ. करूणा जुईकर )
अति-आयुक्त (सेवा)
उल्हासनगर महानगरपालिका